महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त/२०२०/२४ दिनांक :- ०६ जानेवारी, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- <u>महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा- २०२१</u>**
तांत्रिक सहायक व उद्योग निरीक्षक या संवर्गाकरिता गुणपत्रक, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक :- ६१/२०२२ व ६२/२०२२

महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ मधील तांत्रिक सहायक (जाहिरात क्रमांक-६१/२०२२) व उद्योग निरीक्षक (जाहिरात क्रमांक-६२/२०२२) या संवर्गाचा अंतिम निकाल अनुक्रमे दिनांक ०८ डिसेंबर, २०२२ व दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** सदर परीक्षांस उपस्थित असलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील 'View' अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, तसेच गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करू इच्छिणा-या उमेदवारांना फेरपडताळणीकरिता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. :-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉग-इन करावे.

(३) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(४) उपलब्ध होणा-या गुणपत्रातील गुणांची फेरपडताळणी करावयाची असलेल्या परीक्षेची निवड करून 'Save' बटणवर क्लिक करावे.

(५) सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरिताची सदर वेबलिंक दिनांक ०६ जानेवारी, २०२३ ते दिनांक १५ जानेवारी,२०२३, २३: ५९ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**४.** उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरिता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडी वर संपर्क साधता येईल.

**उपसचिव (परीक्षोत्तर अराजपत्रित)**

**ठिकाण – मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**